महाराष्ट्र विधानसभा

पहिले अधिवेशन, २०१९

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

लातूर जिल्ह्यातील अनुदानित खाजगी शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतेर कर्मचाऱ्यांची वैद्यकीय देयके प्रलंबित असल्याबाबत

(१) १५९०१ (०९-०४-२०१५) श्री.बसवराज पाटील (औसा) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील अनुदानित खाजगी शाळांमधील ३०२ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची एकूण रक्कम १ कोटी ३६ लाख ३१ हजार रुपयांची वैद्यकीय देयके २ वर्षांपासून (सन २०१३ पासून) प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शिक्षक संचालक तसेच शालेय शिक्षण विभाग, यांचेकडे सातत्याने पाठपुरावाही करण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू वैद्यकीय देयकांची संबंधित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना प्रतिपूर्ती करुन न देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, शासनाने सदरहू शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांची प्रलंबित वैद्यकिय देयकांची विनाविलंब प्रतिपूर्ती होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे?

श्री. विनोद तावडे (११-०२-२०१९) : (१), (२), (३) (४) कोषागार अधिकारी यांनी नोंदविलेल्या आक्षेपांमुळे सदर कालावधीतील वैदयकीय देयके प्रलंबीत होती. तथापि, आक्षेपांची पूर्तता केल्यानंतर सदर देयके मंजूर करण्यात आलेली आहेत.

पुणे येथील अपंग एकात्मिक युनिटमधील शिक्षकांचे प्रलंबित असलेले वेतन अदा करण्याबाबत

(२) २८८६३ (२७-१२-२०१५) श्री.विजय काळे (शिवाजीनगर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील व विशेषतः पुणे शहरातील अपंग एकात्मिक युनिटमधील मान्य शिक्षकांना सन २०१२ पासून वेतन मिळाले नाही,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी जबाबदार अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत?

श्री.विनोद तावडे (११-०२-२०१९) :(१) शासन निर्णय दिनांक १९.१०.२०१६ अन्वये अपंग एकात्मिक शिक्षण योजना (प्राथमिक स्तर) अंतर्गत कार्यरत विशेष शिक्षकांचे सन २०१२ पासूनचे थकीत वेतन अदा करण्यात आले आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही

(३) प्रश्न उद्भवत नाही

कल्याण (जि.ठाणे) येथील ईस्ट कल्याण वेल्फेअर सोसायटी या संस्थेतील शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतन व इतर सर्व लाभ मिळणेबाबत.

(३) ६१६१४ (२२-०८-२०१६). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील कल्याण (पुर्व) येथील ईस्ट कल्याण वेल्फेअर सोसायटी या संस्थेच्या मॉडेल इंग्लिश हायस्कूल या शाळेत खोटी कागदपत्रे देऊन शिक्षण विभागाची मान्यता मिळविणारे ३ शिक्षक आणि ८ वी पास असलेला परंतू शिक्षक संवर्गातून लिपीक पदाची मान्यता मिळविणारा लिपीक कार्यरत आहेत. तसेच या संस्थेतील १५० शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नियमानुसार वेतन व इतर सर्व लाभ मिळण्यासाठी मा. शिक्षक आमदार व महाराष्ट्राज्य शिक्षक संघटनेने दिनांक १६ जानेवारी,२०१३ तसेच दिनांक ३ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्या सुमारास शाळेसमोर धरणे आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळेच्या प्राथमिक विभागात २८ शिक्षकांपैकी ७ शिक्षक डी.एड आहेत व २१ अप्रशिक्षीत आहेत तसेच सदर शाळेत १६ वर्ष काम केलेल्या मराठी भाषिक व मागासवर्गीय शिक्षिकांना कायम न करता माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान सेवेतून काढून टाकले असून याच कालावधीत १६ बिगर मराठी भाषिक शिक्षक/ शिक्षिकांना संस्थेने कायम केले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सन २००५ पासून ऑडीट रिपोर्ट चॅरिटी कमिशनला सादर न करणे व संस्थेतील गैरकारभारामुळे शिक्षणाधिकारी मीना यादव यांनी संस्थेची मान्यता रद्द करण्याची शिफारस वरीष्ठ अधिकाऱ्यांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने प्रश्नोक्त भाग (१) व (२)बाबत चौकशी करुन तदनुसार काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विनोद तावडे (१२-०२-२०१९) : (१), (२), (३) व (४)

सदर शाळेबाबत प्राप्त तक्रार अर्जाचे अनुषंगाने चौकशी समिती नेमण्यात आलेली होती. त्यानुसार शिक्षणाधिकारी माध्यमिक यांनी दि. ८.११.२०१७ रोजी शाळेस कारणे दाखवा नोटीस दिलेली होती. तथापि, सदर शाळेने खुलासा सादर न केल्याने चौकशी समितीच्या अहवालानुसार शाळेची मान्यता रद्द करण्याची शिफारस शिक्षणाधिकारी माध्यमिक यांनी विभागीय शिक्षण उपसंचालक यांचेकडे दि. ६.१२.२०१८ रोजी केलेली आहे. तसेच शाळेच्या प्राथमिक शिक्षण विभागात प्रशिक्षित शिक्षक भरण्याबाबत कल्याण डोंबिवली महानगरपालिके मार्फत दि. २२.१२०१६ अन्वये शाळेस कळविण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उदभवत नाही.

राज्यातील शिक्षकांनी बारावी परीक्षेच्या पेपर तपासणीत पुकारलेला असहकार

(४) ८३९९६ (२०-०४-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.राजन साळवी (राजापूर), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षकांना सातवा वेतन आयोग लागू करावा, कनिष्ठ महाविद्यालयांसाठी स्वतंत्र प्रशासन सुरु करावे, ऑनलाईन संचमान्यतेतील त्रुटी दूर कराव्यात यांसह इतर विविध प्रलंबित मागण्यांच्या पुर्तेतेसाठी राज्यातील शिक्षकांनी बारावी परीक्षेच्या पेपर तपासणीत असहकार पुकारला असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने गत अनेक वर्षांपासून राज्यातील शिक्षकांच्या प्रलंबित असलेल्या विविध मागण्याची पूर्तता करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विनोद तावडे (१२-०२-२०१९) : (१) होय हे खरे आहे.

(२) कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांचे मागण्याबाबत मा.मंत्री शालेय शिक्षण व मा.मंत्री वित्त यांचेकडे झालेल्या बैठकीमध्ये काही मागण्या मान्य करण्यात आलेल्या असून उर्वरित मागण्याबाबत वित्त विभागासोबत बैठक घेवून निर्णय करण्याचे ठरले आहे.

(३) प्रश्न उदभवत नाही.

राज्यातील सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांमधील सुरक्षेच्या अहवालाबाबत.

(५) ९७६३७ (२९-१२-२०१७). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.किशोर पाटील (पाचोरा) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांमधील सुरक्षेचा अहवाल मा.उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्र्यांनी उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मागितला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विभागाकडून सदर अहवाल प्राप्त झाला आहे काय, असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे व त्यानुषंगाने शासनाने विद्यापीठे व महाविद्यालयातील सुरक्षा व्यवस्थेसाठी कोणकोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विनोद तावडे (२५-०१-२०१९) : (१) हे खरे आहे.

(२) राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांनी सुरक्षेबाबत केलेल्या उपाययोजनांची माहिती खालीलप्रमाणे नमूद केली आहे.

राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांनी सुरक्षेबाबत केलेल्या उपाययोजनांची माहिती

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठाची संलग्नित महाविद्यालये नाहीत. मात्र पारंपारीक विद्यापीठाला संलग्न असणाऱ्या काही महाविद्यालयांमध्ये मुक्त विद्यापीठाची अभ्यासकेंद्र कार्यरत आहेत. सदर अभ्यासकेंद्रांना सुरक्षाव्यवस्थेबाबत विद्यापीठाच्या विभागीय केंद्रामार्फत योग्य त्या उपाययोजना करण्याबाबत विद्यापीठाकडून कळविण्यात आहे.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती-

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठामध्ये Anti- ragging squadanti ragging committee व Anti Ragging Nodal Officers यांची नियुक्ती केलेली आहे. Anti- ragging ragging squad ची नावे दुरध्वनी क्रमांक व ईमेल चे बॅनर विद्यापीठात सर्व ठिकाणी लावण्यात आलेले आहे. त्याच प्रमाणे Squad प्रत्येक वेळी विविध ठिकाणी धाडी घालुन तपासणी करतात. वसतिगृहामध्ये भाग-१ चे व भाग-२ व पुढील विद्यार्थ्यांना वेगवेगळे ठेवण्यात येते. उपहारगृहामध्ये सीसीटीव्ही कॅमेरा बसविण्यात आले आहेत. सुरक्षा रक्षकांना प्रत्येक ठिकाणी विद्यार्थ्यांचा घोळका आढळल्यास तपासणी करणे व Squad वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव-

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने विद्यापीठ परिसरात एकुण ९० सुरक्षा रक्षकांची नियुक्ती केलेली आहे. तसेच विद्यापीठ परिसरात येतांना विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारावर ओळखपत्र असलेल्या विद्यार्थ्यांनाच प्रवेश देण्यात येतो. मुलींच्या वसतिगृहामध्ये सी. सी. टी.व्ही. कॅमेरा बसविण्यात आलेले असून त्यावर सुरक्षा रक्षकांची निगरणी असते. विद्यापीठाने महाविद्यालयांना विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत उपाययोजना करण्याचे निर्देश दिलेले आहे.

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली-

गोंडवाना विद्यापीठाद्वारे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत पुढीलप्रमाणे उपायोजना करण्यात आलेल्या आहे. १. गोंडवाना विद्यापीठातील शैक्षणिक पदव्युत्तर विभागातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेतेसाठी संपूर्ण शैक्षणिक परिसरात तसेच आवश्यक त्या ठिकाणी सी. टी.व्ही. कॅमेरा बसविण्यात आलेला आहे. विद्यार्थ्यांनाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक त्या ठिकाणी सुरक्षा रक्षकाची नेमणुक करण्यात आलेली आहे. विद्यार्थ्यांनाच्या सुरक्षितेच्या दृष्टीने आवश्यक ती ठिकाणी सुरक्षा रक्षकाची नेमणुक करण्यात आलेली आहे. कार्यवाही घेण्यासंदर्भात आदेश निर्गमित करुन बंधनकारक करण्यात आलेले आहे. विद्यापीठ संलग्नित अनेक महाविद्यालयांनी आपल्या महाविद्यालयाच्या परिसरात उपरोक्त उपायोजना केलेल्या आहे. तसेच काही महाविद्यालयातील यासंबंधाने कार्यवाही सुरु असल्याचे कळविले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षितेबाबत उपाययोजना करण्याविषयी विद्यापीठाचे पत्र दि. १३ डिसेंबर, २०१७ च्या परिपत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे. विद्यापीठाच्या हॉस्टेल मेस, कॅटीन येथे CCTV आणि सुरक्षा रक्षक तैनात करुन सुरक्षा व्यवस्था योजना करण्यात आल्या आहेत.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड -

नांदेड विद्यापीठात कंत्राटी पध्दतीने सुरक्षा रक्षक नेमण्यात आलेले असुन सदर सुरक्षा रक्षक मुख्य प्रशासकिय इमारत मा. कुलगुरु कार्यालय, परीक्षा विभाग मुख्य प्रशासकिय मुख्य प्रवेशद्वार मुख्य प्रवेशद्वार (गेट) मुलीचे वसतिगृह, मुलांचे वसतिगृह, मा. कुलगुरु महोदय यांचे निवासस्थान, अतीथी गृह अधिकारी निवास स्थान ग्रंथालय सर्व संकुले (राऊंड), प्रशासकिय इमारत विद्यापीठ उपकेंद्र लातुर व न्यु मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली येथे सुरक्षा रक्षकाची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विद्यापीठ, नागपुर -

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विद्यापीठाचे पत्र दि. २१.१२.२०१७ अन्वये नागपुर विद्यापीठातील सर्व शासकिय व अशासकिय संस्था/ महाविद्यालयांना / विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने शैक्षणिक संस्था, शैक्षणिक परिसर व वसतीगृहे, ग्रंथालय, उपहारगृहे इ. मध्ये सुरक्षेच्या पुरेशा उपाययोजना सुचना देण्यात आल्या आहेत. त्यानूसार नागपुर विभागातील एकुण ०६ शासकिय संस्था /महाविद्यालयांना ०२ ईबीसी मुलांचे वसतिगृहे यांचे कडुन संचालनालयाच्या वरील पत्रामध्ये नमुद केलेल्या सुचनेनुसार कार्यवाही केली असल्याचा अहवाल सादर करण्यात आलेला आहे व तसेच नागपुर विद्यापीठातील अशासकिय अनुदानित महाविद्यालयाचे अहवाल प्राप्त झालेले असून उर्वरित महाविद्यालयांचा कार्यवाही करण्याबाबत पाठपुरावा सुरु आहे.

सोलापुर विद्यापीठ, सोलापुर -

सोलापुर विद्यापीठाने दि. २७.१०.२०१७ रोजीच्या मा. सहसचिव, उच्च व तंत्रशिक्षण शिक्षण, महाराष्ट्र शासन यांच्या पत्रास अनुसुरुन अहवाल शासनास सादर करणेबाबत सर्व संलग्नित महाविद्यालयांना परिपत्रकान्वये कळविण्यात आले.

मुंबई विद्यापीठ, मुंबई -

मुंबई विद्यापीठाने त्यांच्या टिपणीमध्ये असे नमुद केले आहे की, मुंबई विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांना ॲन्टी रॅगिंगबाबत युजीसी नियमाप्रमाणे तात्काळ पालन करण्याचे परिपत्रक सातत्याने विद्यापीठाकडुन प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी पाठविण्यात येते. शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठी महाविद्यालयांनी ॲन्टी रॅगिंगबाबत युजीसी नियमाप्रमाणे तात्काळ पालन करण्याचे परिपत्रक क्र. एसडीब्यू/१८/२०१७, दि. १४ सप्टेंबर २०१७ पाठविण्यात आले. तसेच रॅगिंग प्रतिबंध समिती सर्व महाविद्यालयांमध्ये गठित करण्याबाबत विद्यापीठाकछुन कळविले जाते. महाविद्यालयांना दर्शनी जागेवर ॲन्टी रॅगिंग समिती सदस्यांचे नाव व दुरध्वनी क्रमांक नमूद करण्याचे कळविण्यात येत असून फलकावर ॲन्टी रॅगिंग मदत क्र. हेल्न लाईन १८००-१८०-५५२२ देण्यात येते व कुठल्याही प्रकाराच्या तक्रारीबाबत त्वरीत सदर क्रमांकावर कळविल्याचे सूचित करण्यात येते. ॲन्टी रॅगिंगबाबत समिती व समिती सदस्य ॲन्टी रॅगिग मदत क्र. इ.ची माहिती महाविद्यालयाच्या प्रॉस्पेक्टर माहिती पुस्तकमध्ये नमूद केली जाते. कुठल्याही प्रकारची तक्रार विद्यार्थ्यांकडून नोंद झाल्यास मुंबई विद्यापीठाकडून त्वरीत विद्यापीठ ॲन्टी रॅगिग समिती त्या महाविद्यालयात (शैक्षणिक संस्थेत) जाऊन सदर विषयाची चौकशी करते. समितीचा अहवाल २४ तासांच्या आत मदत क्र. (हेल्प लाईन) १८००-१८०-५५२२ वर देण्याचे आदेश महाविद्यालयास/ शैक्षणिक संस्थेस देण्यात येतात. तसेच शैक्षणिक संस्थेच्या परिसरात सी.सी.टी. व्ही कॅमेरे बसविण्यात परिपत्रकाद्वारे सूचना विद्यापीठाकडून देण्यात येतात.तसेच योग्य ठिकाणी सुरक्षा रक्षकांची नियुक्ती केली आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे -

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये १३६ सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे त्यांची २४ तास गस्त चालु असते. विद्यापीठाच्या प्रत्येक विभागाकडून विद्यार्थ्यांना ओळखपत्रे पुरविली जातात. विद्यापीठ आवारात ती विद्यार्थी दिसतील अशी लावतात.विद्यापीठाकडून मुलींच्या सुरक्षीततेबाबत विशेष काळजी घेतली जाते. मुलींना रात्रीच्या वेळी विद्यापीठ परिसरात वाहन व्यवस्था करुन देण्यात आली आहे. मुलींच्या वसतीगृहात

खानावळ आहे. मुलींच्या वसतिगृहाजवळच महिला वैद्यकिय अधिकारी उपलब्ध आहे. विद्यापीठात महिला अत्याचार विरोधी समिती सक्रिय आहे. विद्यापीठाची सर्व प्रवेशद्वार, महत्त्वाचे व संवेदनशील भाग सी.सी. टी.व्ही कॅमेऱ्यांच्या देखरेखीखाली आहेत. विद्यापीठात एकुण ५४७ इतके सी.सी. टी.व्ही कॅमेरे बसवलेले आहेत. विद्यापीठामध्ये रॅगींगविरोधी समिती कार्यरत आहे. कुलसचिव हे या समितीचे अध्यक्ष आहेत. विद्यार्थी व विद्यार्थीनीमध्ये सुरक्षेबाबत जागृती व प्रबोधनासाठी कार्यक्रम राबविले जातात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

फर्दापूर (जि.औरंगाबाद) येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी संलग्न् असलेल्या नॅशनल महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीबाबत.

(६) १०३२४२ (२९-१२-२०१७). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फर्दापूर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी संलग्न् असलेल्या नॅशनल महाविद्यालयाच्या प्राचार्याकडून १६९ विद्यार्थ्यांचे परिक्षा अर्ज विद्यापीठाकडे पाठविले गेले नसल्याची बाब विद्यार्थी परिक्षा सेंटरवर गेले असताना निदर्शनास आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत विद्यापीठाने परिक्षा अर्ज, विलंब शुल्क या सर्व बाबतीत सहकार्य करूनही महाविद्यालयाकडून कोणतीही कार्यवाही केली गेली नसलेबाबत विद्यार्थी व पालकांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींनीच्या हस्तक्षेपामुळे मध्यरात्री १२ वाजता विलंब परिक्षा शुल्क घेवून विद्यार्थ्यांचे परिक्षा अर्ज भरून हॉल तिकीट देण्यात येवूनही केवळ ३९ विद्यार्थ्यांनी परिक्षा दिली हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, विद्यापीठाने परिक्षेसाठी परिक्षा केंद्रावर सह केंद्रप्रमुख पाठविला नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५))असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले वत्यानुसार विद्यार्थ्यांना झालेला मनस्ताप व शैक्षणिक नुकसानीस जबाबदार असणाऱ्या विद्यापीठ व महाविद्यालयाच्या सबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विनोद तावडे (२५-०१-२०१९) : (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी विहित मुदतीत विद्यापीठाकडे परिक्षा शुल्काचा भरणा न केल्यामुळे सदर विद्यार्थ्यांना प्रवेशपत्र निर्गमित करण्यात आले नव्हते मात्र महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी याबाबत विनंती केल्यानंतर विद्यापीठाने सदर १६९ परीक्षार्थींना नियमित शुल्क, विलंब शुल्क व अतिविलंब शुल्क आकारुन विद्यापीठाकडुन प्रवेशपत्र निर्गमित करण्यात आले.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही. सदर महाविद्यालयाच्या परिक्षा केंद्रासाठी विद्यापीठाने दि. ५/११/२०१७ च्या कार्यालयीन आदेशान्वये डॉ. एस. एस. परिहार यांची सहकेंद्रप्रमुख म्हणून नियुक्ती केली होती.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

विदर्भातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठा सह गोंडवाना गडचिरोली विद्यापीठामध्ये संशोधन करणा-या (पीएचडी) विद्यार्यांच्या प्रवेश नोंदणीबाबत.

(७) १०५३३२ (०५-०४-२०१८). श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील प्रामुख्याने विदर्भातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठा सह गोंडवाना गडचिरोली विद्यापीठामध्ये संशोधन करणा-या (पीएचडी) विद्यार्थ्यांच्या प्रवेश नोंदणी परीक्षेमध्ये (पीईटी) अर्ज दाखल करणा-या विद्यार्थांची संख्या कमी झाली असल्याबाबत दिनांक २९ डिसेंबर २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात सन २०१६ पेक्षा २०१७ ची विद्यार्थी संख्या कमी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विदर्भातील बहुतांश विद्यापीठात अनेक विषयाकरिता गाईडची उपलब्धता नसल्यामुळेही नोंदणी कमी झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबांची कारणे काय आहेत?

श्री. विनोद तावडे (२४-०१-२०१९) : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे. सप्टेंबर, २०१६ मध्ये झालेल्या पेट परिक्षेत एकुण ४३०२ व जानेवारी, २०१८ मध्ये झालेल्या पेट परिक्षेत एकुण ३३०२ विद्यार्थ्यांचे अर्ज प्राप्त झाले होते.

(३) हे खरे नाही. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठामध्ये काही अपवादात्मक विषय वगळता पुरेशा प्रमाणात मार्गदर्शक उपलब्ध आहेत. विद्यापीठ अनुदान आयोगाने निर्धारित केलेल्या निकषानुसार संशोधन केंद्र म्हणुन ज्या महाविद्यालयांना मान्यता देण्यात आली आहे, त्या महाविद्यालयातील संबंधित विषयाच्या पुर्णकाळ शिक्षकांनाच मार्गदर्शक म्हणुन मान्यता देण्यात येते. इतर महाविद्यालयातील शिक्षकांना मार्गदर्शक म्हणुन मान्यता देता येत नसल्याने काही विषयासाठी मार्गदर्शक उपलब्ध होत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई विदयापीठाच्या ऑनलाईन मुल्यांकनामुळे विदयापीठाला आर्थिक भार सहन करावा लागत असल्याबाबत.

(८) १०५७७९ (०५-०४-२०१८). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विदयापीठाच्या ऑनलाईन मुल्यांकनामुळे आर्थिक परिस्थिती सुस्थितीत नसतांना विदयापीठाच्या तिजोरीला दुप्पट आर्थिक भार सहन करावा लागत असल्याने उक्त अतिरिक्त खर्चाबाबतची गंभीर समस्या प्रशासनासमोर निर्माण झाली असल्याचे दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सदरील विदयापीठाला ऑनलाईन मुल्यांकन व पेपर तपासणीसाठी अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विनोद तावडे (२५-०१-२०१९) : (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र सार्वजनिक अधिनियम २०१६ शुल्क निश्चिती समितीसाठी संविधिक यंत्रणा विकसित करण्याबाबत

(९) १०६५२९ (०५-०४-२०१८). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संत गाडगेबाबा विद्यापीठ अमरावती येथे महाराष्ट्र सार्वजनिक अधिनियम २०१६ शुल्क निश्चिती समितीसाठी संविधिक यंत्रणा विकसित करण्याबाबत तसेच अन्य मागण्यांबाबत उक्त विद्यापिठाचे कुलगुरू यांनी प्रधान सचिव उच्च व तंत्र शिक्षण यांना दिनांक १ जानेवारी,२०१८ रोजी वा त्यासुमारास विनंती पत्र दिले आहे , हे खरे आहे काय,
(२) तसेच संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात एम.ए. साठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा या विषयाचा अभ्यासक्रम सुरु करण्यास शासनाने सन २०१७-१८ या वर्षापासून मान्यता दिली असून सदर विषय व अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी शिक्षक व शिक्षकेतर पदे तसेच इमारतीचे बांधकाम यासाठी निधी मंजूर करावा अशी मागणी स्थनिक लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक २२ नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यासुमारास केली, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच उक्त विद्यापीठात परीक्षा संचालकांच्या व ऑनलाईन मुल्यांकनाचे कंत्राट असलेल्या कंपनीच्या अत्यंत बेजबाबदार कारभाराच्या विरोधात अमरावती विद्यापीठ
अन्यायग्रस्त विद्यार्थी कृती समितीद्वारे सबळ पुराव्यासह माहे नोव्हेंबर २०१७ मध्ये वा त्या दरम्यान कुलगुरु यांजकडे तक्रार केली आहे, हे ही खरे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विनोद तावडे (२४-०१-२०१९) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात एम.ए. साठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा या विषयाचा अभ्यासक्रम सुरु करण्यास शासनाने सन २०१७-१८ या वर्षापासुन मान्यता दिलेली नाही तर विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने दि. ९/८/२०१७ च्या सभेत दिलेल्या मान्यतेनुसार विद्यापीठ साधारण निधीतुन सदर अभ्यासक्रम सन २०१७-१८ पासुन सुरु करण्यात आला आहे.
तसेच सदर विषय व अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी शिक्षक व शिक्षकेतर पदे तसेच इमारतीचे बांधकाम यासाठी निधी मंजूर करावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दि. २२ नोव्हेंबर, २०१७ रोजी किंवा त्यासुमारास केल्याबाबतचे निवेदन शासनास प्राप्त झाल्याचे आढळुन येत नाही.

(३) होय, हे खरे आहे.

(४) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अन्यायग्रस्त विद्यार्थी कृती समिती, अमरावती यांनी सादर केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारीत मुख्यत्वे नमूद असलेल्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत प्रा. डॉ. ए. बी. मराठे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करुन सदर प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील गरजू विद्यार्थ्यांना गत ३ वर्षांपासून अनुज बिडवे मेमोरिअल स्कॉलरशिप पासून वंचित राहावे लागल्याबाबत

(१०) १११००४ (०५-०४-२०१८). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे विद्यापीठाने अनुज बिडवे मेमोरिअल स्कॉलरशिप ची माहिती विद्यार्थ्यांना वेळेत दिली नसल्याने गत ३ वर्षांपासून गरजू विद्यार्थी स्कॉलरशिप पासून वंचित राहिले असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले, व त्या अनुषंगाने निष्काळजीपणा करणाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली, वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विनोद तावडे (२४-०१-२०१९) : (१) हे खरे नाही. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने "अनुज बिडवे मेमोरिअल स्कॉलरशिप" ची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर "स्कॉलरशिप" या संवर्गात उपलब्ध करुन दिलेली आहे. सदर स्कॉलरशिपची आर्थिक मदत, विद्यार्थ्यांची निवड व इतर सर्व प्रक्रिया ही Lancaster University, UK विद्यापीठाच्या विभागप्रमुखाकडुन होते. सर्व प्रक्रिया ही विद्यार्थ्याने परस्पर करावयाची आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ फक्त माहिती आपल्या संकेतस्थळावर ठेवत असते. त्यामुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने तीन वर्षापासुन कोणालाही स्कॉलरशिपपासुन वंचित ठेवलेले नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई विद्यापीठाचे विधी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी निकालाच्या प्रतिक्षेत असल्याबाबत

(११) ११२११२ (०५-०४-२०१८). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.डी.एस.अहिरे (साक्री) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाने विधी अभ्यासक्रमाच्या परीक्षा होऊन ६३ दिवस उलटले असूनही विधी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी निकालाच्या प्रतिक्षेत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यापीठाच्या नियमानुसार परीक्षा झाल्यावर ३० ते ४५ दिवसांत निकाल लागणे आवश्यक असताना सदरील निकाल प्रलंबित ठेवण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त निकाल लवकरात लवकर जाहिर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विनोद तावडे (२४-०१-२०१९) : (१) अंशत: खरे आहे. विधी अभ्यासक्रमाच्या द्वितीय सत्र वर्ष २०१७ मधील प्रथम वर्ष (३वर्षीय)/(५ वर्षीय) अभ्यासक्रमाच्या एकुण १५ परिक्षा नोव्हेंबर, २०१७ ते फेब्रुवारी, २०१८ या कालावधीत घेण्यात आलेल्या आहेत.
(२) मुंबई विद्यापीठातील परिक्षेच्या उत्तरपत्रीकांच्या तपासणीकरिता Onscreen Marking System ही नविन संगणक प्रणाली राबविण्याचे निश्चित केले आहे. सदर प्रणाली नवीन असुन त्यामध्ये येणा-या तांत्रीक अडचणीमुळे परिक्षेचे निकाल लावण्यास विलंब झालेला आहे.
(३) मुंबई विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील पहिल्या सत्रातील परीक्षांचे निकाल लागण्यास झालेल्या विलंबाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन मुंबई विद्यापीठाच्या निकालाच्या On-Screen Marking System (OSM) प्रणालीची सखोल चौकशी करण्याकरीता प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान, मंत्रालय, मुंबई, यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असुन सदर समितीने आपला गोपनीय अहवाल दि. १ सप्टेंबर, २०१८ रोजी शासनास सादर केला आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने शासन स्तरावर पुढील कार्यवाही चालु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे विद्यापीठ आणि महाविद्यालयातील उपहारगृहात निकृष्ट दर्जाचे अन्नपदार्थ वापरले जात असल्याबाबत

(१२) ११६६४४ (२३-०७-२०१८). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे विद्यापीठ आणि महाविद्यालयातील उपहारगृहात निकृष्ट दर्जाचे अन्नपदार्थ वापरले जात असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे विद्यापीठातील मे.आदर्श कॅन्टीन, पुणे विद्यापीठ, या पेढीच्या तपासणीत त्रुटीं आढळून आल्याचे निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार अशा उपहारगृहावर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विनोद तावडे (२५-०१-२०१९) :(१) हे अंशत: खरे आहे.
पुणे विद्यापीठ परिसरातील केवल आदर्श उपहागृहाबाबतच अशी तक्रार प्राप्त झाली होती. मात्र पुणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामध्ये येणाऱ्या अन्य कोणत्याही महाविद्यालयाबद्दल अशी तक्रार विद्यापीठाकडे प्राप्त झालेली नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) महाराष्ट्र शासनाच्या अन्न व औषध प्रशासन, पुणे या कार्यालयातील अधिकाऱ्यांनी सदर उपहारगृहाची चौकशी केली असता त्यांना सदर उपहारगृहातील काही पायाभूत सुविधांमध्ये त्रुटी आढळून आल्या होत्या. सदर त्रुटींचा विचार करुन अन्न व औषध प्रशासन (महाराष्ट्र राज्य), पुणे प्रशासनाने उपहार चालकाचा अन्न व औषध परवाना पाच दिवसासाठी निलंबित केला होता.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई विद्यापीठाच्या इंजिनिअरींग शाखेच्या विद्यार्थ्यांना गुण वाढवून पास करण्यात आल्याबाबत.

(१३) ११७०४३ (२०-०७-२०१८). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या इंजिनिअरींग शाखेच्या विद्यार्थ्यांना पुनर्मुल्यांकनाच्या निकालानंतर देण्यात येणा-या पत्रात बनावट सही करुन गुण वाढवून पास करुन घेतल्याचे दिनांक १५ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी तपास करण्यासाठी कुलगूरुंनी समिती गठित करुन चौकशीचे आदेश दिले असून सदर चौकशी समितीने पोलीसांची मदत घ्यावी असेही निदेश प्रकुलगुरुंनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या सर्व प्रकरणात विद्यापीठाच्या परीक्षा विभागातीलच काही कर्मचारी सामील असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त प्रकरणी जबाबदार असलेल्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विनोद तावडे (२४-०१-२०१९) : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) मुंबई विद्यापीठाच्या इंजिनिअरींग शाखेच्या विद्यार्थ्यांना पुनर्मुल्यांकनाच्या निकालानंतर देण्यात येणा-या पत्रात बनावट सही करुन गुण वाढवून पास करुन घेतल्याचे निदर्शनास आल्यानंतर सदर प्रकरणी प्रशासनाच्या निर्देशान्वये बांद्रा-कुर्ला संकुल पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करण्यात आली असुन चौकशी समितीसुद्धा नेमण्यात आली आहे. सदर प्रकरणी चौकशी सुरु असुन यामध्ये कोणाचा समावेश आहे हे अद्याप निष्पन्न झालेले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

शासकीय सेवेत स्पोर्टस कोट्यातून भरती झालेल्या खेळांडूना वेतनवाढ मिळण्याबाबत

(१४) ११७८८० (२०-०७-२०१८). श्री.सुनिल शिंदे (वरळी) : सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या सेवेत स्पोर्टस कोट्यातून भरती झालेल्या खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय स्तरावर पदक मिळविल्यास त्यांना २ वेतनवाढ देण्यात येते आणि राष्ट्रीय स्तरावर पदक मिळविल्यास १ वेतनवाढ देण्यात येते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात ॲथलेटिक्स वगळता इतर खेळांच्या आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावरील पदक विजेत्या खेळाडूंना नियमाप्रमाणे वेतनवाढ मिळालेली नाही, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विनोद तावडे (२४-०१-२०१९) : (१) होय.
(२) अशी बाब शासनाच्या निदर्शनास आली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

शिवाजी विद्यापीठातील (जि.कोल्हापूर) निकाल जाहिर करण्याबाबत

(१५) ११८२२९ (२३-०७-२०१८). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिवाजी विद्यापीठातील (जि.कोल्हापूर) एमकेसीएल च्या चुकीमुळे सुमारे ४० हजार विद्यार्थ्यांच्या निकालावर परिणाम झाला असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर, २०१७ मध्ये परिक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांचे निकाल डाटा बदलांमध्ये अडकले असल्याने प्रलंबित निकालामुळे विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासह नोकरीपासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विनोद तावडे (२५-०१-२०१९) : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठाचा बीबीएचा पेपर फुटल्याबाबत

(१६) ११८३४३ (२०-०७-२०१८). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठाचा बीबीए शाखेचा पेपर फुटल्याची माहिती असतांनाही तसेच फुटलेला पेपर्स घेऊन कॉपी करतांना विद्यार्थी पकडले असतांनाही विद्यापीठाने संबधितावर कारवाई न करता निकाल जाहिर केल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विनोद तावडे (२४-०१-२०१९) : (१) हे खरे नाही. सदर परिक्षेचा पेपर फुटला नव्हता तर एका विद्यार्थ्याने या पेपर मध्ये कॉपी केलेली होती व त्याला नियमानुसार शिक्षा झालेली आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

शिवाजी विद्यापीठातील परिक्षा विभागाच्या चुकीच्या प्रश्नपत्रिकेमुळे विद्यार्थ्यांची झालेली गैरसोय.

(१७) ११९११७ (२३-०७-२०१८). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवाजी विद्यापीठाने माहे एप्रिल मध्ये वा त्या दरम्यान घेतलेल्या परिक्षेदरम्यान बी.ए.भाग एकच्या हिंदी विषयाच्या चुकीच्या प्रश्नप्रत्रिके मुळे कोल्हापूर, सांगली, सातारा या जिल्हयातील विद्यार्थ्यांना दीड तास ताटकळत बसावे लागले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विनोद तावडे (२५-०१-२०१९) : (१) होय, हे खरे आहे. दि. ५/४/२०१८ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत बी.ए.भाग-१ सत्र-२ आधुनिक हिंदी साहित्य (ऐच्छक) या विषयाच्या परिक्षेच्या वेळी प्रश्नानियोजकाने लखोट्यात सत्र-२ ऐवजी सत्र-१ अशी चुकीची प्रश्नपत्रिका घातली गेल्याने विद्यार्थ्यांना चुकीची प्रश्नपत्रिका मिळाली होती. सदर बाब परिक्षा केंद्रमार्फत विद्यापीठास समजताच तात्काळ शिल्लक दुसरा प्रश्नसंच गोपनिय मुद्रणालयास पाठवून तो विद्यापीठास प्राप्त झाल्यानंतर सर्व संबंधित परिक्षाकेंद्राना प्राचार्यांच्या नोंदणीकृत ई-मेलव्दारे गोपनियरित्या योग्य प्रश्नपत्रिका पाठविण्यात आली व परिक्षा पार पाडण्यात आली.

(२) याबाबत अध्यक्ष, प्रश्ननियोजक समिती यांचेकडून प्रश्नपत्रिका लखोट्यात भरताना चुक झाल्याचे विद्यापीठाने कबुल केले आहे त्यामुळे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ४८(५) मधील तरतुदीनुसार सदर प्रकरण परिक्षा प्रमाद समितीपुढे चौकशीसाठी ठेवण्यात आले असून त्यांचा अहवाल प्राप्त होताच त्यामध्ये दोषी आढळणाऱ्यांवर नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई विद्यापीठाच्या परीक्षेदरम्यान पश्चिम उपनगरातील मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांना मराठीतील प्रश्नपत्रिका मिळाल्या नसल्याबाबत

(१८) ११९१२६ (२०-०७-२०१८). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या नुकत्याच पार पडलेल्या परीक्षेदरम्यान पश्चिम उपनगरातील मराठी माध्यमाच्या अनेक विद्यार्थ्यांना मराठीतील प्रश्नपत्रिका मिळाल्या नसल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची पडताळणी करताना येत्या शैक्षणिक वर्षात इंग्रजी प्रश्न व त्याखालीच भाषांतरीत केलेला मराठी प्रश्न असे स्वरुप ठेवण्यात येणार असल्याचे माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक यांनी दिली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विनोद तावडे (२५-०१-२०१९) :(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्य जलतरण संघटनेची मान्यता रद्द झाल्याबाबत

(१९) ११९८७२ (२०-०७-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भारतीय जलतरण महासंघाने राज्य जलतरण संघटनेची मान्यता रद्द केल्याचे माहे मे २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील दोन संघटनांच्या वादात राज्यातील जलतरणपटुंचे होत असलेले नुकसान टाळण्यासाठी राज्यनिवड स्पर्धा न घेता केवळ निवडचाचणी घेण्याचा निर्णय महासंघाने घेतला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने जलतरणपटूंचे होणारे नुकसान टाळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?
श्री. विनोद तावडे (२४-०१-२०१९) : (१) (२) व (३) हे खरे आहे. तथापि, एकविध खेळाच्या राष्ट्रीय व राज्य खेळ संघटना या स्वायत्त संघटना असून या संघटनाच्या अंतर्गत बाबींवर शासन हस्तक्षेप करत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई विद्यापीठाच्या रत्नागिरी उपकेंद्रात रेल्वे अभियांत्रिकी अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत

(२०) ११९९२२ (२३-०७-२०१८). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विद्यापीठाच्या रत्नागिरी उपकेंद्रात रेल्वे इंजिनियर घडवणारा १२ वी नंतरचा तीन वर्षाचा महत्वकांशी अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी सन २०१५ मध्ये राज्यपाल, रेल्वेमंत्री, व शिक्षण मंत्री यांच्या उपस्थितीत रेल्वे प्रशासनाबरोबर करार करण्यात आला असल्याचे दिनांक ४ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास निर्देशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा अभ्यासक्रम केंव्हा पासुन सुरू करण्यात येणार आहे, व त्याबाबतच्या प्रस्तावाची सद्यस्थिती काय आहे,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार उक्त अभ्यासक्रम सुरू करणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विनोद तावडे (२५-०१-२०१९) :(१) हे अंशत: खरे आहे. मुंबई विद्यापीठाच्या रत्नागिरी रेल्वे संशोधन केंद्राचे उद्घाटन तात्कालिन रेल्वेमंत्री श्री. सुरेश प्रभु यांच्या हस्ते झाले. सदर कार्यक्रमास मा. राज्यपाल, मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण विभाग हे हजर होते. यावेळी रेल्वे मंत्रालय व मुंबई विद्यापीठ यांच्या दरम्यान रत्नागिरी रेल्वे संशोधन केंद्रात रेल्वे अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत करार झाला होता.
(२) रत्नागिरी उपकेंद्रामध्ये विविध तांत्रिक अडचणींमुळे रेल्वे अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रम सुरु करता आलेला नाही.
(३) रत्नागिरी उपकेंद्रात रेल्वे अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश हे संयुक्त प्रवेश परिक्षेच्या (Entrance Exam) माध्यमातुन होत असल्याने प्रवेशाबाबतचे धोरण रेल्वे मंत्रलयाकडून निश्चित होणे आवश्यक होते. याकरिता मुंबई विद्यापीठातील अधिकारी रत्नागिरी येथील रेल्वे अधिकाऱ्यांच्या संपर्कात होते. सदर अभ्यासक्रमासाठी रत्नागिरी उपकेंद्राच्या नवीन इमारतीतील एक मजला राखुन ठेवण्यात आला होता. तथापि, इतर महाविद्यालयात अभियांत्रिकी पदवी प्रवेशाची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली तरीही सदर उपकेंद्रातील प्रवेशाबाबत रेल्वेकडून सुचना मिळाल्या नाही. अशा विविध तांत्रिक अडचणीमुळे रेल्वेचे अभ्यासक्रम सुरू करता आले नाहीत परंतु त्यासाठी विद्यापीठ अजुनही प्रयत्नशील आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

शिवाजी विद्यापीठाच्या(जि.कोल्हापूर) पदवी प्रमाणपत्रात कुलसचिवांची सही नसल्याबाबत

(२१) १२१२०६ (२३-०७-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिवाजी विद्यापीठाच्या (जि.कोल्हापूर) माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान पार पडलेल्या ५४ व्या दिक्षांत समारंभात वाटप करण्यात आलेल्या पदवी प्रमाणपत्रावर कुलसचिवांची सही नसल्याने २२ हजार प्रमाणपत्र रद्दबातल ठरविण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे विद्यापीठ प्रशासनाला दोन लाखाचा भूर्दंड बसला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, यांस जबाबदार असणा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विनोद तावडे (२५-०१-२०१९) : (१) होय, हे खरे आहे.
(२) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुर या विद्यापीठाच्या ५४ व्या दिक्षांत समारंभातील पदवी प्रमाणपत्रावर दि. ११३.०२.२०१८ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेतील विषयान्वये फक्त कुलगुरुंची

सही असलेले पदवी प्रमाणपत्रांची छपाई करण्यात आली होती. तथापि, दि. १७.०३.२०१८ रोजी कुलसचिव व कुलगुरु यांच्या सह्या असलेल्या पदवी प्रमाणपत्राची छपाई करण्याबाबत वरिष्ठांनी आदेश दिल्याने विहित प्रक्रिये द्वारे सदरची पुर्नछपाई करण्यात आली असुन त्यामुळे विद्यापीठास भुर्दंड बसलेला नाही.

(३) याबाबत विद्यापीठ अधिकार मंडळ व्यवस्थापन परिषदेमार्फत चौकशी समिती गठीत करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई विदयापीठास निधी देण्याबाबत

(२२) १२१६१२ (२३-०७-२०१८). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय समितीने मुंबई विदयापीठाला निधी मंजूर करण्यात येवूनही राज्याने मात्र मुंबई विदयापीठाला वगळून इतर विदयापीठांना निधीचे वाटप केले असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार मुंबई विदयापीठास निधी देण्याबाबत तसेच निधी देण्यास दुर्लक्ष करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विनोद तावडे (२५-०१-२०१९) : (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई विद्यापिठातील प्रथम वर्ष व द्वितीय वर्षाच्या परिक्षा महाविद्यालया अंतर्गत घेण्याबाबत

(२३) १२१६२८ (२३-०७-२०१८). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापिठातील प्रथम वर्ष द्वितीय वर्षाच्या परिक्षा महाविद्यालया अंतर्गत घेण्यात येत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू परिक्षा या महाविद्यालयाअंतर्गत घेण्यात येणार असल्याने परिक्षा पद्धतीमध्ये गैरव्यवहाराला मोठ्याप्रमाणात चालना मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, व त्यानुसार महाविद्यालया अंतर्गत घेण्यात येत असलेली परिक्षा पद्धती बंद करुन मुंबई विद्यापिठाअंतर्गत पुन्हा घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विनोद तावडे (२४-०१-२०१९) : (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापुर जिल्ह्यातील शालेय स्पर्धांसाठी इचलकरंजी शहर व हातकणंगले ग्रामीण गट स्वतंत्र करण्याची केलेली मागणी

(२४) १२१९९१ (२०-०७-२०१८). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) : सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय क्रिडा स्पर्धांसाठी कोल्हापुर जिल्ह्यात इचलकरंजी शहर व हातकणंगले ग्रामीण एकाच गटात समाविष्ट करण्यात आल्यामुळे ग्रामीण भागातील खेळाडूंवर अन्याय होत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील रचनेमुळे ग्रामीण विभागातील खेळाडूंना शहरातील खेळाडूंशी सोईसुविधा अभावी स्पर्धा करणे शक्य होत नसल्याने ग्रामीण खेळाडू अनेक स्पर्धांपासुन वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शालेय स्पर्धांसाठी इचलकरंजी शहर व हातकणंगले ग्रामीण गट स्वतंत्र करण्याची मागणी क्रिडा शिक्षकांसह खेळाडूंच्या संघटनांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरील मागणीबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विनोद तावडे (२४-०१-२०१९) : (१) (२) व (३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील मुक्त विद्यापीठांच्या परिक्षांचे नियोजन करण्याबाबत

(२५) १२२२२८ (२३-०७-२०१८). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे नियोजन कोलमडले असून परिक्षांचे वेळापत्रक लांबणीवर टाकल्याने विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, व त्यानुसार राज्यातील मुक्त विद्यापीठांच्या परिक्षांच्या नियोजनाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच शासन मार्गदर्शक सूचना देणार आहे काय असल्यास, याबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विनोद तावडे (२५-०१-२०१९) : (१) हे खरे नाही. विद्यापीठाने सुरुवातीला विविध शिक्षणक्रमांच्या परिक्षांचे आयोजन दि. ११.०५.२०१८ पासुन करण्यात येणार असल्याने जाहिर केले होते. तथापि, उत्तरपत्रिका छपाईस लागलेल्या विलंबामुळे सदर परिक्षांच्या वेळापत्रकात बदल करुन त्या दि. २५/५/२०१८ पासून सुरु करण्यात आल्या व त्याबाबत परिक्षा सुरु होण्यापुर्वी १५ दिवसा अगोदर सदरच्या परिक्षांचे वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने सिव्हील इंजिनीअरिंगचा मागच्याच वर्षीचा पेपर विद्यार्थ्यांना दिल्याबाबत

(२६) १२२९७२ (२३-०७-२०१८). श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने सिव्हील इंजिनीअरिंगचा मागच्या वर्षीचा पेपर पुढीलवर्षीच्या सिव्हीलच्या विद्यार्थ्यांना दिल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यापीठाच्या कायदा व नियमांतर्गत वेगळी समिती असूनही मागच्या वर्षीचा पेपर पुढीलवर्षी देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय. असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार ही परीक्षा पुन्हा घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विनोद तावडे (२५-०१-२०१९) : (१) हे अंशत: खरे आहे. माहे मे, २०१७ व माहे मे, २०१८ या दोन्ही वर्षी झालेल्या S. E. (Civil Engineering) (Sem-III)(Choice based) च्या परिक्षेतील Strength of Material या विषयाच्या प्रश्न पत्रिकेतील ७५ % प्रश्न सारखेच असल्याचे आढळुन आले मात्र सिव्हील इंजिनीअरिंगचा मागच्या वर्षीचा पेपर पुढीलवर्षीच्या सिव्हीलच्या विद्यार्थ्यांना दिल्याची बाब खरी नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील शासकीय निमशासकीय कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना शिष्यवृत्ती मिळण्यासाठी वार्षिक उत्पन्नाचे मुळ वेतन ग्राहय धरण्याबाबत

(२७) १२४३३६ (०२-०८-२०१८). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय, निमशासकीय कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना अनुदानीत व विनाअनुदानीत वैदयकीय महाविदयालय व अभियांत्रिकी महाविदयालयातून शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी भारत सरकारच्या सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजनेमध्ये पालकांचे वार्षीक उत्पन्नाचे मुळ वेतन ग्राहय धरण्यात यावे असे शासनाचे लेखी निर्देश आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी राज्य शासनाचे लेखी निर्देश नसल्यामुळे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीपासून वंचित रहावे लागत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील शासकीय निमशासकीय कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना शिष्यवृत्ती मिळण्यासाठी भारत सरकारच्या सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजनेप्रमाणे वार्षिक उत्पन्नाचे मुळ वेतन ग्राहय धरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२३-०१-२०१९) : (१) हे खरे नाही.

(२) व (३) केंद्र शासनाने विहित केलेल्या अटी व शर्तीनुसार सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती मंजूर करण्याची कार्यवाही करण्यात येते. केंद्र शासनाच्या शिष्यवृत्ती योजनेसाठी राज्य शासनाने निर्देश देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अखिल भारतीय नागरी सेवा या राष्ट्रीय क्रिडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या संघाच्या प्रलंबित मागण्यांबाबत

(२८) १२६०२६ (२०-०७-२०१८). श्री.सुभाष साबणे (देगलूर) : सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अखिल भारतीय नागरी सेवा या राष्ट्रीय क्रिडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या राज्य शासनाच्या संघास पहिल्या तीन क्रमांकास वेतन वाढ देणे, सदरहू स्पर्धेचे प्रमाणपत्र खेळाडूंसाठी राखीव पदासाठी ग्राह्य धरणे, वर्षे सरावासाठी सवलत देणे, शासकीय खेळाडूंना शिवछत्रपती पुरस्कार देण्याच्या अनुषंगाने नियमावलीत बदल करणे, शासन सेवेत थेट गट "अ" व "ब" मधील पदावर नियुक्ती देण्यात आलेल्या खेळाडूंमधील वयाची ४५ वर्षे पूर्ण झालेल्या खेळाडूंना विभागीय परिक्षेतून सूट देण्याच्या प्रस्तावावर तात्काळ कार्यवाही करणे इत्यादी मागण्यांचा प्रस्ताव शासनाकडे गत ४ वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तुत प्रस्तावाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने सदरहू प्रस्तावास मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विनोद तावडे (२४-०१-२०१९) : (१) व (२) शासनाच्या वित्त विभागाच्या दि.११.०५.१९८९, दि.३०.७.१९९२ व दि.२७.०२.२००४ रोजीच्या शासन निर्णयांनुसार अखिल भारतीय नागरी सेवा या राष्ट्रीय क्रिडा स्पर्धेत अतिप्राविण्य प्राप्त खेळाडूंना वेतनवाढ देण्यात येते.

अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धेचे प्रमाणपत्र खेळाडूंसाठी राखीव पदासाठी ग्राह्य धरण्याबाबतचा कोणताही प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.

या विभागाचा दि.२३.०९.२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार क्रीकेट, फुटबॉल, कबड्डी व ॲथलेटिक्स या खेळांच्या स्पर्धेसाठी, दरवर्षी १ नोव्हेंबर ते ३१ मार्च या कालावधीत दुपारी ३.३० वाजता कार्यलय सोडण्याची सवलत अनुज्ञेय आहे.

या विभागाचा दि. २४.१०.२०१८ रोजीच्या शुद्धिपत्रकानुसार शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू) यासाठी अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धा खेळलेले खेळाडू पात्र ठरविण्यात आले आहेत.

सामान्य प्रशासन विभागाने दि.०१.०३.२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार सेवा प्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा/विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यापसून सूट देण्याची वयोमर्यादा ४५ वर्षा वरुन ५० वर्ष करण्यात आली आहे. त्यामुळे शासन सेवेत थेट गट "अ" व "ब" मधील पदावर नियुक्ती देण्यात आलेल्या खेळाडूंमधील वयाची ४५ वर्षे पूर्ण झालेल्या खेळाडूंना विभागीय परिक्षेतून सूट देण्याचा आता प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील ख्रिश्चन समाजातील नागरीकांच्या सर्वांगिण विकासासाठी १० टक्के आरक्षण मिळण्याबाबत.

(२९) १२६४३६ (०४-१२-२०१८). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दिपक चव्हाण (फलटण) : सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ख्रिश्चन समाजातील नागरीकांच्या सर्वांगिण विकासासाठी १० टक्के आरक्षण मिळावे तसेच इतर मागण्यांसाठी ख्रिश्चन संघटनांनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक ६ ऑगष्ट, २०१८ रोजी तसेच वारंवार मागण्या केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे, व त्यानुसार आतापर्यंत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे, तसेच ख्रिश्चन समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी त्यांना आरक्षण मंजुर करुन त्यांच्या समस्या सोडविण्यासंदर्भात कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे व त्याची फलनिष्पत्ती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विनोद तावडे (२९-०१-२०१९) :(१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील अभियांत्रिकी ऑनलाईन प्रवेश प्रक्रीयेतील गैरकाराभाराची चौकशी करण्याबाबत

(३०) १२६५५९ (१८-११-२०१८). श्री.संजय पोतनीस (कलिना) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तंत्रशिक्षण संचालनालयाच्यावतीने राबविण्यात येणा-या इंजिनियरिंगच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेतील गैरव्यवहारामुळे अनेक विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात आल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सदर ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेतील गैरव्यवहारासंदर्भात चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विनोद तावडे (२०-११-२०१८) : (१) नाही,

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये संचालक, तंत्र शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात आलेल्या थेट द्वितीय वर्ष पदवी अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या केंद्रिभूत प्रवेश प्रक्रीयेअंतर्गत दुसऱ्या प्रवेश फेरीतील जागा वाटपामध्ये चूक झाल्याचे निदर्शनास आल्याने त्यापूर्वी केलेले जागा वाटप तात्काळ रद्द करुन सुधारीत जागा वाटप प्रदर्शित करण्यात आले. त्यामुळे कोणत्याही प्रकारचे चुकीचे जागा वाटप झालेले नाही व यामध्ये कोणताही गैरव्यवहार झाला नाही.

(२) शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये थेट द्वितीय वर्ष पदवी अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या प्रवेश फेरीतील जागा वाटपामध्ये झालेल्या चूकीबाबत तंत्र शिक्षण संचालनालयाकडून चौकशी करण्यात आली. सदर चौकशी अहवाल तंत्र शिक्षण संचालनालयाने व्यावसायिक अभ्यासक्रमांचे प्रवेश करण्यासाठी सक्षम प्राधिकारी असलेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणास सादर केला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यामध्ये केंद्र सरकारने जारी केलेल्या क्रीडा आचारसंहितेला (स्पोर्ट्स कोड) काहीही प्रतिसाद नसल्याबाबत

(३१) १२६९५६ (०६-१२-२०१८). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये केंद्र शासनाने जारी केलेल्या क्रीडा आचारसंहितेला (स्पोर्ट्स कोड) काहीही प्रतिसाद नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हे स्पोर्ट्स कोड अंमलात आणण्यासाठी सन २०१५ मध्ये समिती स्थापन करण्याचे आश्वासन देऊनही समिती स्थापन झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे राज्यामध्ये खेळाडूंची संख्या घटली असल्याचे निदर्शनास आले, आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, स्पोर्ट्स कोड अद्यापपर्यंत अंमलात न आणण्याची नेमकी काय कारणे आहेत,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार राज्यात स्पोर्ट्स कोड लागू करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विनोद तावडे (२३-०१-२०१९) : (१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) शासन स्तरावर कार्यवाही चालु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

स्वामी रामानंद तिर्थ, मराठवाडा विद्यापीठ नांदेड यांनी पीएचडी चाचणी परिक्षा पुढे ढकल्याबाबत

(३२) १२७१९३ (०४-१२-२०१८). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांनी पेट ही पीएचडी ची चाचणी परिक्षा सन २०१८ मध्ये घेण्याचे ठरविले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परिक्षेकरिता विद्यार्थ्यांकडून परिक्षा फी जमा करण्यात आली असून परिक्षेचे निगेटीव्ह गुणदान देखील ठरविण्यात आले होते, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचे निगेटीव्ह गुणदान ठरविण्यात आले असतांनाही विद्यापीठाने विद्यार्थ्यांची दिशाभूल करुन नियोजित परिक्षा पुढे ढकलण्यात आल्याचे कळविले आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार ऐन परिक्षेच्या वेळी विद्यार्थ्यांना वेठीस धरणा-या संबंधित विद्यापीठाच्या अधिका-यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विनोद तावडे (२४-०१-२०१९) : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड मार्फत पेट ही पीएचडी ची चाचणी परिक्षा दिनांक ३० सप्टेंबर, २०१८ रोजी आयोजित करण्यात आली होती. परंतु सदर परिक्षा काही अपरिहार्य कारणास्तव पुढे ढकलण्यात येऊन ती दिनांक २१ ऑक्टोबर, २०१८ रोजी घेण्यात येणार असल्याबाबतच्या सुचना दिनांक २६ सप्टेंबर, २०१८ नुसार विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली होती. तसेच याबाबत सर्व संबंधित परिक्षार्थींना एस.एम.एस. द्वारे कळविण्यात आले होते. त्यामुळे विद्यापीठाने विद्यार्थांची दिशाभुल केलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

तीन आंतरराष्ट्रीय खो-खो पटूंची शिपाई या पदावर नेमणूक केल्याबाबत

(३३) १२७३१३ (०४-१२-२०१८). ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) : सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्राचे नाव ज्या खेळाडूंनी उज्ज्वल केले व ज्यांनी राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर राज्याचे प्रतिनिधित्व केले आहे अशा खेळाडूंना पोलीस उपअधिक्षक किंवा त्या पदाच्या समकक्ष श्रेणी पदावर नेमणूक करण्यात येते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, युवराज जाधव (सांगली), बाळासाहेब पोकार्डे (कोल्हापूर) आणि कविता घाणेकर (मुंबई उपनगर) या खो-खो खेळाडूंनी राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करूनही शासनाने त्यांची शिपाई हया पदावर नियुक्ती केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उक्त तिन्ही खेळाडूंच्या पोलीस उपअधिक्षक किंवा त्या पदाच्या समकक्ष श्रेणी पदावरील नियुक्तीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विनोद तावडे (२४-०१-२०१९) : (१) होय.

दि. ०९ डिसेंबर २०१० रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयात नमुद केलेल्या कार्यपध्दती नुसार कार्यवाही करुन राज्याचे नाव उज्ज्वल केलेल्या अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना शासकीय सेवेत थेट नियुक्ती देण्यात येते.

(२) होय.

शासन सेवेत गट-अ ते गट-ड मधील पदावर खेळाडूस थेट नियुक्ती करण्याकरिता दि. २१ मे, २०११ आणि दि. १० एप्रिल २०१३ च्या शासन निर्णयानुसार क्रीडा प्राविण्य स्तर निश्चित केला आहे. सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार तपासणी करुन श्री. युवराज जाधव, श्री. बाळासाहेब पोकार्डे व श्रीमती. कविता घाणेकर यांना गट-ड मधील पदावर थेट नियुक्ती देण्याचे निश्चित केले आहे.

(३) व (४),

प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील विद्यार्थी विधी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशापासून वंचित राहणार असल्याबाबत

(३४) १२८१४९ (०४-१२-२०१८). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य सामाईक प्रवेश (सीईटी) कक्षाचे मुख्य कार्यकारी अधिकारी परदेशात गेले असल्याने सुमारे दोन हजार विद्यार्थी विधीच्या पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशापासून वंचित राहणार असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने विद्यार्थी विधी अभ्यासक्रमापासून वंचित राहू नयेत याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विनोद तावडे (२३-०१-२०१९) : (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(२) विद्यापीठाकडून पदवी/पदव्युत्तर परीक्षेचे निकाल उपलब्ध झाले नसल्याने, विधी ३ वर्ष अभ्यासक्रमाच्या प्रवेशापासून उमेदवार वंचित राहू नये यासाठी, ऑनलाईन अर्ज भरण्याच्या विहित मुदतीनंतर, ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी २ वेळा मुदतवाढ देण्यात आली होती. या वाढीव कालावधीत संबंधित उमेदवारांनी त्यांचे ऑनलाईन अर्ज भरल्याने, कोणताही उमेदवार प्रवेशापासून वंचित राहिल्याचे निदर्शनास आले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील पॉलिटेक्निक पदविका अभ्यासक्रमांच्या जागा रिक्त असल्याबाबत

(३५) १२८१५३ (०४-१२-२०१८). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.वैभव पिचड (अकोले) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या पाठोपाठ दहावीनंतर प्रवेश होणाऱ्या पॉलिटेक्निक पदविका अभ्यासक्रमांच्या ७१ हजार ९०० जागा रिक्त असून त्यामध्ये पाच हजार जागा या शासकीय आणि अनुदानित महाविद्यालयातील असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एवढया मोठया प्रमाणावर जागा रिक्त राहण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार या अभ्यासक्रमाचे महत्व वाढवून या अभ्यासक्रमाकडे विद्यार्थ्यांचा ओढा वाढविण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विनोद तावडे (२८-०१-२०१९) : (१) होय,

राज्यात अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या जागा रिक्त राहण्याची कारणे पुढीलप्रमाणे आहेत:-

(१) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे कडून पदविका अभ्याक्रमांच्या विनाअनुदानित संस्थांना मागील काही वर्षामध्ये संस्थांच्या मागणीनुसार विविध पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यामुळे राज्यातील पदविका अभ्यासक्रमांच्या एकुण मंजुर प्रवेश क्षमतेमध्ये मागील काही वर्षात वाढ झालेली आहे.

(२) तथापी, उपलब्ध जागांच्या प्रमाणात रोजगाराच्या संधीमध्ये पुरेशी वाढ झालेली नाही. त्यामुळे पदविका अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेण्यास विद्यार्थ्यांचा कल कमी झालेला आहे.

(३) पदविका अभ्यासक्रमाकडे विद्यार्थ्यांचा ओढा वाढविण्यासाठी पुढील प्रमाणे उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.:-

(१) तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत पदविका अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रीया ऑन लाईन पध्दतीने राबविण्यात येत आहे.

(२) प्रवेश प्रक्रीयेबाबतची सविस्तर माहिती विद्यार्थी व पालकांना देण्यासाठी तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयांच्या स्तरावरून माहे एप्रिल/मे या महिन्यामध्ये जिल्हास्तरावर ठिकठिकाणी शिबीरे आयोजित करण्यात येऊन संबंधीत अधिकारी व विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करण्यात येते.

(३) प्रवेश प्रक्रियेची जाहीर अधिसूचना स्थानिक वर्तमानपत्रामध्ये प्रसिद्ध करण्यात येते तसेच त्यासाठीचे माहितीप्रत्रक आवश्यक त्या सुचनांसह संचालनालयाच्या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येते.

(४) विद्यार्थ्यांना बदलत्या तंत्रज्ञानाशी सुसंगत ज्ञान देणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाकडून विद्यार्थ्यांना आवश्यक तांत्रिक व व्यक्तीमत्व विषयक कौशल्य विकसीत करण्यासाठी औद्योगीक क्षेत्रातील नामांकित व्यक्ती व शिक्षण तज्ञ यांच्या शोध सभा घेऊन आधूनिक तंत्रज्ञान, उद्योगधंद्यांच्या बदलत्या गरजा, मार्केट सर्व्हे, जॉब ॲनालीसीस या सर्वांचा आभ्यास करुन “I-Scheme” हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१७-२०१८ पासून लागू करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा तालुक्यासह विविध तालुका क्रीडा संकुलांची झालेली दुरवस्था

(३६) १२८२६२ (०४-१२-२०१८). श्री.राजु तोडसाम (अर्णी) : सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील विविध तालुका क्रीडा संकुलांची प्रचंड दुरवस्था झाली असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये व त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निधी अभावी काही कामे प्रलंबित तर काही कामे होऊनही त्याची देखभाल होत नसल्याचे तसेच पांढरकवडा तालुक्यातील क्रीडा संकुलाचीही दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार उक्त तालुका क्रीडा संकुलाची दुरवस्था दूर करून खेळाडूंना चांगले क्रीडा संकुल उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय?

श्री. विनोद तावडे (२३-०१-२०१९) :(१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात अधिकारी व कर्मचा-यांची रिक्त पदे भरण्याबाबत

(३७) १२८३९१ (०४-१२-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.पास्कल धनारे (डहाणू) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात उप कुलसचिव, सहाय्यक कुलसचिव, कक्षाधिकारी, उच्चश्रेणी लघुलेखक, सहाय्यक अभियंता, लेखानिक, शिपाई आदि पदे भरण्यास सन २०१५ पासून बंदी केली असल्याने अधिकारी/कर्मचा-यांची ३२६ पदे रिक्त असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यापीठाच्या अधिकारी कर्मचा-यांच्या पदभरतीस शासनाकडून मान्यता न मिळाल्याने सुमारे ३० टक्के पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू विद्यापीठास पदभरतीकरीता शासनाकडून मान्यता नसण्याची कारणे काय,

(४) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विनोद तावडे (०५-०२-२०१९) : (१) हे अशंत: खरे आहे.

शासन निर्णय वित्त विभाग दि.२५.०५.२०१७ नुसार जोपर्यंत सुधारित आकृतीबंध निश्चित होत नाहीत तोपर्यंत पदभरतीस निर्बंध आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे.

प्रश्नात नमूद विद्यापीठात २६.९० टक्के पदे रिक्त आहेत.

(३) व (५) शासन निर्णय वित्त विभाग दि.२५.०५.२०१७ नुसार जोपर्यंत सुधारित आकृतीबंध निश्चित होत नाही तोपर्यंत पदभरती करण्यास निर्बंध आहेत. संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचेमार्फत दि.०६.०९.२०१८ च्या पत्रान्वये सर्व अकृषि विद्यापीठांच्या सुधारित आकृतीबंधाचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून याबाबत दि.०१.११.२०१८ रोजी सचिव स्तरावर सर्व अकृषि विद्यापीठांचे कुलसचिव यांची बैठक घेण्यात आली. सदरहू बैठकीमध्ये विद्यापीठांनी पाठविलेले आकृतीबंधाचे प्रस्ताव वित्त विभाग, शासन परिपत्रक, दि.२९ जून, २०१७ अन्वये दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार नसल्याने वित्त विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सुधारित प्रस्ताव संचालक, उच्च शिक्षण यांच्यामार्फत शासनास सादर करण्याबाबत सर्व अकृषि विद्यापीठांना सूचित करण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई विद्यापीठाच्या पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्याबाबत

(३८) १२८७९६ (०४-१२-२०१८). श्री.राज पुरोहित (कुलाबा), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठामार्फत उन्हाळी सत्रात घेण्यात आलेल्या पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झालेले नसल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यापीठाचे निकाल प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदरहू निकाल जाहीर करून विद्यार्थ्यांना दिलासा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विनोद तावडे (२५-०१-२०१९) : (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

सातारा जिल्हयातील महाविद्यालयात दूरशिक्षण (बहिस्थ) केंद्रामार्फत घेण्यात येणाऱ्या प्रवेश प्रक्रियेस झालेला विलंब

(३९) १२८९१२ (०४-१२-२०१८). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात नोकरी करुन शिक्षण घेणाऱ्या तसेच महाविद्यालयांच्या नियमित परिक्षेस बसू न शकणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे याकरिता महाविद्यालयांमधून दूरशिक्षण (बहिस्थ) केंद्रामार्फत अभ्यासक्रम प्रक्रिया राबविण्यात येतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सातारा जिल्हयातील दूरशिक्षण केंद्र चालविणाऱ्या महाविद्यालयांना युजीसीकडून मान्यता मिळण्यास विलंब झाल्यामुळे प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रवेश विलंबाने मिळाल्याने विद्यार्थ्यांना दोन महिन्याच्या कालावधीतच परिक्षा द्यावी लागणार असल्याने अनेक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार परिक्षेसाठी पुरेसा कालावधी मिळावा या करिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विनोद तावडे (२५-०१-२०१९) : (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

मालेगांव (जि.नाशिक) येथे नविन औद्योगिक प्रशिक्षण संस्था स्थापन करण्याबाबत

(४०) १२९५२६ (१०-१२-२०१८). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) : सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव, (जि.नाशिक) येथे विद्यमान औद्योगिक प्रशिक्षण संस्थेव्यतिरिक्त व्यावसायिक शिक्षणाची सोय नसल्यामुळे अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थी व्यावसायिक शिक्षणापासून वंचीत राहत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी अल्पसंख्यांक विभागामार्फत नविन औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय.) ला मंजूरी मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. शालेय शिक्षण व अल्पसंख्याक मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांसाठी शासनस्तरावर नवीन औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू करण्याबाबतचा प्रस्ताव तपासाधिन आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मालेगांव येथे नविन औद्योगिक प्रशिक्षण संस्था स्थापन करण्याबाबत अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (३०-०१-२०१९) : (१), (२), (३), (४) व (५)

मालेगांव (जि.नाशिक) येथे अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांकरिता नवीन शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू करण्यास शासन निर्णय दि.०३ डिसेंबर, २०१८ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

राज्यातील दिव्यांगाना सार्वजनिक ठिकाणांबरोबरच महाविद्यालयातही होत असलेल्या गैरसोयींबाबत

(४१) १३००४६ (०४-१२-२०१८). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दिव्यांगाना शासकीय तसेच सार्वजनिक ठिकाणांबरोबच महाविद्यालयातही अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिव्यांग विद्यार्थ्यांना आजही बहुतांश महाविद्यालयांमध्ये जाण्यासाठी व्हीलचेअर पुरवली जात नाहीत तसेच रॅम्पची सुविधा उपलब्ध नसून स्वच्छतागृहांचीही व्यवस्था केली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकश केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सर्व महाविद्यालये व विद्यापीठांमध्ये सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विनोद तावडे (२४-०१-२०१९) : (१) हे अंशत: खरे आहे

(२) दिव्यांग विद्यार्थ्यांना विविध सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत दि. २७/०८/२०१८ च्या शासन निर्णयान्वये निर्देश देण्यात आले आहेत सदर शासन निर्देशास अनुसरुन आवश्यकती कार्यवाही करण्याकरिता संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी सर्व अकृषी विद्यापीठांतील कुलसचिव व व्यवस्थापक, मालमत्ता विभाग यांच्या बैठकांचे आयोजन केले असून दिव्यांगाना देण्यात येणाऱ्या सुविधांच्या अनुषंगाने वेळोवेळी आढावा घेण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर जिल्हयातील शिवाजी विद्यापीठामार्फत घेण्यात आलेल्या एम.कॉम. अभ्यासक्रमाच्या परिक्षेचा निकाल जाहीर करण्याबाबत

(४२) १३०२६५ (०४-१२-२०१८). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील शिवाजी विद्यापीठामार्फत घेण्यात आलेल्या एम.कॉम.विषयाच्या परिक्षेचा निकाल लागलेला नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निकाल उशिरा लागण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, यामुळे विद्यार्थ्यांच्या पुढील शिक्षणांवर परिणाम होत आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, व त्यानुसार एम.कॉम. परिक्षेचा निकाल लावण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विनोद तावडे (२४-०१-२०१९) : (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील (औरंगाबाद) प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्यांची चौकशी करण्याबाबत

(४३) १३०५६७ (०४-१२-२०१८). श्री.संजय शिरसाट (औरंगाबाद पश्चिम) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठामध्ये सन २०१२ -१३ या कालावधीमध्ये तत्कालीन कुलसचिव व सध्या उच्च शिक्षण संचालक, पुणे येथे कार्यरत असलेले संचालक यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठामध्ये कार्यरत असतांना अनेक अवैध नियुक्त्या केल्या असल्याचे चौकशी समितीमध्ये निष्पन्न झालेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत उच्च शिक्षण संचालक पुणे यांनी मा.मंत्री उच्च शिक्षण यांच्याकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उच्च शिक्षण संचालक या महत्वाच्या पदावर त्यांनी कुलसचिव या पदासाठी चुकीचा अनुभव व त्याच अनुभवाच्या आधारे एमपीएससीला कुलसचिव या पदाचा अनुभव दाखवून उच्च शिक्षण संचालक या पदावर नियुक्ती करुन घेतलेली आहे हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, या बाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधित दोषिंवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कय आहेत?

श्री. विनोद तावडे (०५-०२-२०१९) : (१) व (२) प्रश्नाधीन प्रकरण सद्य:स्थितीत शासनस्तरावर विचाराधीन आहे.

(३) संचालक (बीसीयुडी), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांनी दि.०७.०२.२०१४ रोजी दिलेल्या प्रमाणपत्र विचारात घेऊन महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या दि.२१.१०.२०१४ च्या शिफारशीनुसार शासन निर्णय दि.०५.०१.२०१५ अन्वये संचालक, उच्च शिक्षण या पदावर नियुक्ती करण्यात आली.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

श्रीमती नाथीबाई दामोदर ठकरसी महिला विद्यापिठातील कर्मचाऱ्यांना वेतनाची थकबाकी अदा करण्याबाबत

(४४) १३०७२१ (०४-१२-२०१८). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापिठात तांत्रिक प्रयोगशाळा सहायक या संवर्गातील कर्मचाऱ्यांची ६ व्या वेतन आयोगातील वेतनाची थकीत रक्कम न मिळाल्याने सदरहू रक्कमेची व्याजासहीत प्रतिपूर्ती करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी व कर्मचाऱ्यांनी माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान मा.राज्यपाल, मा.उच्च तंत्र शिक्षण मंत्री व राज्यमंत्री, कुलगुरु श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापिठ, सचिव, उच्च तंत्र शिक्षण विभाग यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली हे खरे आहे काय,

(२) असल्यास उक्त कर्मचाऱ्यांची ६ व्या वेतन आयोगातील वेतनाची थकीत रक्कम न देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यानुसार सदरहू कर्मचाऱ्यांना वेतनातील थकीत रक्कम देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विनोद तावडे (०८-०२-२०१९) : (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अभियांत्रिकी, हॉटेल मॅनेजमेन्ट, औषधनिर्माण शास्त्र, वास्तू कला, व्यवस्थापन, वैद्यकीय, वैद्यकीय पुरक व विधी या शाखांमधील अभ्यासक्रमांना शुल्क नियमन प्राधिकरणामधून वगळल्याबाबत

(४५) १३०९३१ (१८-११-२०१८). श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.अनिल कदम (निफाड) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अभियांत्रिकी, हॉटेल मॅनेजमेन्ट, औषध निर्माण शास्त्र, वास्तू कला, व्यवस्थापन, वैद्यकीय, वैद्यकीय पुरक व विधी या शाखांमधील सर्व अभासक्रम हे व्यावसायीक अभ्यासक्रम म्हणून ग्राह्य न धरता तसेच शुल्क नियमन प्राधिकरणामधून वगळण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त अभ्यासक्रम शुल्कावर कोणाचेच नियंत्रण राहणार नसल्याने मनमानी शुल्क घेण्याचे अधिकार संस्थांना मिळणार आहेत, हे ही खरे आहे काय,

४ असल्यास याबाबत शसनाने चौकशी केली अहे काय असल्यास त्यात काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे?

श्री.विनोद तावडे (२०-११-२०१८) : (१) नाही, तथापि अभियांत्रिकी, तंत्रज्ञान पदविका, औषधनिर्माणशास्त्र पदविका व हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान पदविका हे

३ व्यावसायिक अभ्यासक्रम महाराष्ट्र विनाअनुदानित व्यावसायिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ च्या कलम २(द) सह कलम ३ (१) व (२) नुसार व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून बिगर घोषित (Denotify) करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे.

(२) प्रवेश नियामक प्राधिकरणाने व्यावसायिक पदविका अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून प्रवेश घेणाऱ्या मागास विद्यार्थ्यांकरीता जात पडताळणी प्रमाणपत्र बंधनकारक केले होते. तथापि, या विद्यार्थ्यांकरीता जात पडताळणीची सोय उपलब्ध नसल्याने मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित विचारात घेऊन हे पदविका अभ्यासक्रम, बिगर व्यावसायिक म्हणून घोषित करण्याचा निर्णय घेतला आहे.

(३) नाही, राज्यातील तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील विना अनुदानित व कायम विना अनुदानित अभियांत्रिकी, तंत्रज्ञान पदविका, औषधनिर्माणशास्त्र पदविका व हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान पदविका अभ्यासक्रमाचे शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासूनचे शुल्क निर्धारण शुल्क नियामक प्राधिकरणाने केले आहे अशा संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० वा त्यापुढील कालावधीकरीता अधिक शुल्काची मागणी केली तर अशा संस्थांचे शुल्क निर्धारण शुल्क नियामक प्राधिकरणाने करावे, असा निर्णय शासनाने घेतला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात गुणवाढवून देण्याचा होत असलेला गैरप्रकार

(४६) १३११४१ (०४-१२-२०१८). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठच्या परिक्षा विभागात अधिकारी, कर्मचारी व दलाल यांच्या संगनमताने अनेक वर्षापासुन गुणवाढवुन देण्याचा गैरप्रकार सुरू असल्याचे माहे ऑगस्ट, मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार दोषीवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विनोद तावडे (२५-०१-२०१९) :(१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

कवियित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव येथील मुला-मुलींच्या वस्तीगृहामधील गैरसोयींबाबत

(४७) १३११८८ (०४-१२-२०१८). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कवियित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथील मुला-मुलींच्या वस्तीगृहामध्ये अशुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत असल्याचे तसेच कंत्राटदारामार्फत निकृष्ट दर्जाचे भोजन मिळत असल्याचे विद्यार्थ्यांच्या आलेल्या तक्रारीवरून माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यानुसार या वस्तीगृहातील मुला-मुलींना शुद्ध पिण्याचा पाणीपुरवठा व उत्तम प्रकारचे भोजन मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली, तसेच विद्यार्थांना निकृष्ट दर्जाचे भोजन पुरविणाऱ्या कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विनोद तावडे (२३-०१-२०१९) : (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

चंद्रपूर जिल्हयातील खाजगी संस्थांनी क्रिडांगण विकास व युवक कल्याण योजनेच्या निधीचा अपहार केल्याबाबत

(४८) १३१४४३ (०४-१२-२०१८). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) : सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील १२ खाजगी संस्थांनी क्रिडांगण विकास व युवक कल्याण योजनेच्या निधीचा अपहार केल्याचे दिनांक २९ जुलै, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार उक्त निधीचा अपहार करणाऱ्यावर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विनोद तावडे (२३-०१-२०१९) : (१) होय, हे खरे आहे.

(२) उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, नागपूर विभाग, नागपूर यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली असून ज्या संस्थांनी अनुदान घेवून गैरवापर अथवा अपहार अथवा फसवणुक केली आहे १७३ व ३४ अन्वये फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४८) प्रश्न उद्भवत नाही.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पेपर पुनर्मुल्यांकनाबाबत

(४९) १३२३२५ (०४-१२-२०१८). श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सहामाही परीक्षेत इंजिनिअरिंग शाखेतील दुसऱ्या वर्षाच्या विद्यार्थांना ग्रेस गुण दिले नाहीत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पेपर पुनर्मुल्यांकन प्रक्रियेत हलगर्जीपणा केल्याने अनेक विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास पुनर्मुल्यांकन प्रक्रियेत झालेल्या हलगर्जीपणास जबाबदार असणाऱ्या कर्मचारी अधिकारी यांच्यावर विद्यापीठाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(४) तसेच या संदर्भ शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२४-०१-२०१९) : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

मोहाडी (जि.भंडारा) येथील क्रीडा संकुल बांधकामाकरिता जागा उपलब्ध करून देण्याबाबत

(५०) १३२५२१ (०४-१२-२०१८). श्री.चरण वाघमारे (तुमसर) : सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहाडी (जि.भंडारा) येथील तालुका क्रीडा संकुल बांधकाम मंजूर असून प्रस्तावित जागेचे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने मा.जिल्हाधिकारी यांना स्थानिक लोकप्रतिनिधीनी जागा उपलब्ध करून देण्याकरिता दिनांक २५ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे,हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, उक्त बांधकामाकरिता निधी उपलब्ध असून जागेअभावी निधी अखर्चित राहिल्याने दुसऱ्या जागेचा प्रस्ताव सादर करुनही प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्यात आलेली नाही हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विनोद तावडे (२३-०१-२०१९) : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) तालुका क्रीडा संकुल, मोहाडी करिता मौजा महालगांव तलाठी सा.क्र.१३ येथील गट क्र.१३ मधील ३.३५ हे.आर. शासकीय जागेकरिता तहसिलदार, मोहाडी यांच्या दिनांक १६.१०.२०१८ च्या पत्रान्वये जाहीरनामा देण्यात आलेला असून सदर जागा प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. जागा प्राप्त होताच तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्याबाबत कार्यवाही केली जाईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

जितेंद्र भोळे
सचिव (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.